**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०४ ची साक्ष</u>**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - चेतन रावजी घाडीगावकर
वय - ३७ वर्षे
व्यवसाय - खाजगी नोकरी
रा/ने - डोंबिविली मुंबई

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोगत्ता श्रीमती यु.आर.जाधव यांचेमार्फत शपथेवर सरू</u>**

१. माझे मुळ गाव रामगड ता. मालवण हे आहे. मी, माझी पत्नी, मुलगी, माझा भाऊ व त्याची पत्नी असे मुंबई येथे मिळून राहतो. रामगडला माझी आई व वडील राहतात. वडील हयात नाहीत. माझ्या वडीलांचा अपघात निधन झाले. सदर अपघात दि. २८/११/२०२३ रोजी दुपारी १२.०० झाला होता. घटनेच्या वेळेस मी मुंबई येथे होतो. अपघाताबद्दल माझा माझा चुलत भाऊ सखाराम घाडीगावकर यांनी मला माहिती दिली. सखाराम गाडीगावकर यांनी मला फोनवरुन म्हणाले की, वडीलांचा अपघात झाला आहे आम्ही त्यांना नागवेकर हॉस्पीटल कणकवली येथे घेवून जात आहे. फोन आल्यावर मी माझया भावाला कळविले आणि मालवण येथे आलो. आम्ही मुंबईहून दि. २८/११/२०२३ रोजी निघून दि. २९/११/२०२३ रोजी पहाटे मालवण येथे पोहोचलो. अपघाताची प्रत्यक्ष घटना ही आमचे चुलत भाऊ शंकर अर्जुन घाडीगावकर यांनी प्रत्यक्ष पाहिली असून त्यांनी आम्हाला झालेली घटना जशीच्या तशी सांगितली. शंकर अर्जुन घाडीगावकर हे सध्या त्रिंबक, बगाडेवाडी, आचरेकर बंगला येथे राहण्यास आहेत. शंकर अर्जुन घाडीगावकर यांनी आम्हाला असे सांगितले की, आमचे वडील घरी येत असताना मागून भरधाव वेगाने दुसरी मोटरसायकल येवून मागून धडकली. मोटरसायकल कोणची होती याबद्दल माहिती सांगितली नाही. अपघात झाल्यानंतर हॉस्पीटलमध्ये माझ्या वडीलांचे निधन झाले.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपीतर्फे उलट तपास विधिज्ञ श्री.एस.एन.पई यांचेमार्फत</u>**

२. माझया वडीलांचे वय अपघाताच्या वेळेस ६३ वर्षे होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्यावेळेस आम्हाला अपघाताबद्दल पहिला फोन आला त्यावेळेस आम्हाला अपघाताबाबत

कोणतीही माहिती नव्हती. पोलीसांनी माझा जबाब नोंदविल्यानंतर मी तो वाचून खात्री केली होती.

३. मी पोलीसांना जबाब देताना अपघाताची प्रत्यक्ष घटना ही आमचे चुलत भाऊ शंकर अर्जुन घाडीगावकर यांनी प्रत्यक्ष पाहिली असून त्यांनी आम्हाला झालेली घटना जशीच्या तशी सांगितली. शंकर अर्जुन घाडीगावकर हे सध्या त्रिंबक, बगाडेवाडी, आचरेकर बंगला येथे राहण्यास आहेत. शंकर अर्जुन घाडीगावकर यांनी आम्हाला असे सांगितले की, आमचे वडील घरी येत असताना मागून भरधाव वेगाने दुसरी मोटरसायकल येवून मागून धडकली असे सांगितले होते. सदर बाब माझया जबाबात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी शंकर अर्जुन घाडीगावकर यांचा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणून जबाब नोंदविलेला नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, शंकर अर्जुन घाडीगावकर यांनी आम्हाला असे सांगितले की, आमचे वडील घरी येत असताना मागून भरधाव वेगाने दुसरी मोटरसायकल येवून मागून धडकली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी सरतपासामध्ये नमूद केलेली माहिती ही ऐकीव आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी जसा माझा जबाब नोंदविला त्याप्रमाणे मी आजरोजी साक्ष देण्याचा प्रयत्न केला. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पुर्ण

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

दि. २७-१०-२०२५

एम.के.फकीह
न्यायदंडाधिकारी वर्ग - १ मालवण.